नि.क्र. २६

## उलटतपास उजरदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री यु.के. धोंगडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.

हे म्हणणे खरे आहे की, विश्वंभर इराप्पा राजुरे यांना मुलगा नाही. मला राच्चनावाडी येथे देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाल्यानंतर मी माझे पतीच्या घरी रहात आहे. सन २०२४ मध्ये माझे पती मयत झाले आहेत. माझा एक मुलगा पालघर येथे पी.एस.आय. म्हणून नोकरीस आहे. माझे इ.४ थी पर्यत शिक्षण झाले आहे. मला थोडे थोडे वाचता लिहीता येते. हे म्हणणे खरे नाही की, विश्वंभर इराप्पा राजुरे यांना मुलगा नव्हता म्हणून त्यांनी दत्तात्रय राजुरे यांना दत्तक घेतले होते.

हे म्हणणे खरे नाही की, मयत विश्वभंर राजुरे यांची सेवा सुश्रुषा हे दत्तात्रय राजुरे करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मयत विश्वंभर राजुरे यांनी जमीन गट क्र. १७२/२ क्षेत्र १ हे. ४० आर, ग्राम पंचायत मिळकत क्र. ३१८ व ९५ ही मृत्यूपत्राधारे दत्तात्रय राजुरे यांच्या नावाने केली आहे.

प्रश्न– विश्वंभर राजुरे यांनी दत्तात्रय राजुरे यांच्या नावाने नोंदणीकृत मृत्यूपत्र क्र. १९५३ /२०१५ करुन दिले होते.

उ.– माझे वडीलांना सुधरत नव्हते. माझे वडीलांना दारु पाजुन दत्तात्रय राजुरे यांनी ते मृत्यूपत्र करुन घेतले होते.

हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना सुधरत नव्हते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते मृत्यूपत्र दाडगे मल्लीकार्जुन व अशोक मोरगे या साक्षीदारासमक्ष दुय्यम निबंध कार्यालय येथे केले आहे. मी अशोक काशिनाथ मोरगे यांना ओळखते. तो आमच्या येथे कधी कधी येत

होता त्यामुळे मी त्यांना ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, दत्तात्रय राजुरे यांनी दि.दा.क्र. ११८/२०१७ माझे विरुध्द, अशोक मोरगे व इतर विरुध्द केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मृत्यूपत्रातील मिळकत ही हाणमंत जवळगा या गावातील आहे.

हे म्हणणे खरे नाही की, महेश भोसले यांना मी ती मिळकत बेकायदेशिरित्या विकली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, मी ती कायदेशिररित्या विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. ७४१ व ७७२ हे रद्द झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या बाबत आणखीन कार्यवाही सुरु आहे.

वारसाचे निघत नव्हते म्हणून हे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, या पुर्वी देखील मी वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला होता. तो कधी दाखल केला होता हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते प्रकरण या प्रकरणाच्या अगोदर दाखल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते प्रकरण दि.१७.०२.२०१८ रोजी खारीज झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती बाब माहीत असतांना देखील मी खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरण क्र. ७८/२०१६ याबाबतचा उल्लेख मी या प्रकरणात केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सर्व माहीत असतांना देखील मी जाणुन बुजून चुकीचे प्रकरण दाखल केले आहे. मी अर्जासोबत कागदपत्र दाखल केले नाही.

मी मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले आहे. माझे वडील दि. २२.०२.२०१६

रोजी वारले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांच्या मृत्यूची नोंद दि.२२.०२.२०१६ पुर्वीच करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यू प्रमाणपत्रावर ग्राम सेवकाची खोटी सही आहे. हे मला लक्षात येत नाही की, नि.क्र. ६ वर ग्राम सेवकाच्या सहीची झेरॉक्स झाल्यानंतर शिक्का मारण्यात आला आहे.

प्रश्न– नि.क्र. ६ वर ते कोणत्या तारखेला देण्यात आले आहे याची नोंद नाही.

उ.– साक्षीदार उत्तर देत नाही.

प्रश्न– तुम्ही जाणुन बुजून हस्तलीखीत नि.क्र. ६ आणले आहे.

उ. मी जाणुन बुजून हस्तलिखीत आणलेले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामसेवक यांच्या शिक्क्याचा गैरवापर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाची दिशाभुल करण्याकरीता खोटे प्रमाणपत्र मी नि.क्र. ६ वर दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वडीलांची मिळकत हडप करण्याकरीता खोटे प्रकरण दाखल केले आहे. मी वारसाची नोंद व्हावी म्हणून तलाठयाकडे अर्ज दिला होता किंवा नाही हे आवठत नाही. हे मला माहीत नाही की, मी तलाठयाकडे अर्ज केल्यामुळे दत्तात्रय राजुरे यांनी हरकत नोंदविली होती. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांच्याकडे त्याबाबतचे प्रकरणे दाखल आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, तशी परिस्थीती असतांना मी खोटा अर्ज दाखल केला आहे व खोटी साक्ष देत आहे.

4 दि. किरकोळ अर्ज क्र.४१/२०२०
महानंदा वि.. निरंक

नि.क्र. २६

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. २०/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर